# भारतातील उदारीकरण
## (Liberalisation in India)

जगातील अनेक राष्ट्रांनी १९८० नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या तिन्ही संकल्पना एकत्रित आणून आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. भारत सरकारनेदेखील जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी १९९१ मध्ये एक आर्थिक कार्यक्रम किंवा आर्थिक धोरण स्वीकारले. या नव्या आर्थिक कार्यक्रमात किंवा धोरणात आर्थिक उदारीकरण , सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण, जागतिकीकरण, बाजारधिष्ठित अर्थव्यवस्था, नवे तंत्रज्ञान इत्यादी घटकांचा समावेश आहे. हे सर्व घटक परस्परांवर अवलंबून आहेत. यापैकी कोणत्या घटकांचा किती प्रमाणात आपण स्वीकार करतो यावर नव्या आर्थिक कार्यक्रमाचे यश अवलंबून असते. या प्रकरणात आपण उदारीकरणाचा अर्थ, उदारीकरणातील विविध टप्पे आणि भारतातील उदारीकरणाचा विविध क्षेत्रावर झालेला परिणाम इत्यादी गोष्टींचा अभ्यास करणार आहोत.

**उदारीकरणाचा अर्थ** :

उदारीकरणाचा अर्थ पाहण्यासाठी उदारीकरणाच्या तज्ज्ञांनी दिलेल्या काही व्याख्या अभ्यासणे योग्य ठरते. काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) **डॉ. एम. रामनजनेयुल** यांच्या मते, आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात आणि उत्पादन, गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे, परवाने मोडीत काढणे होय. (Economic liberalisation means scraping of the undesirable controlls and licensing over investment, imports and production.)

२) **विल्यम जे. व मोल** यांच्या मते, अर्थव्यवस्थेतील कोणत्याही क्षेत्रात उत्पादन, गुंतवणूक व वितरण यासाठी मुक्तप्रवेश आणि कोणत्याही उद्योगातून मुक्तपणे बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य असल्यास आर्थिक उदारीकरण म्हणतात.

३) **डॉ. व्ही. एन. अत्री** यांच्या मते, निर्यातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजारधिष्ठित किंमत यंत्रणा स्वीकारण्याच्या प्रक्रियेस आर्थिक उदारीकरण म्हणतात.

४) बाजारयंत्रणा आणि मुक्त स्पर्धा यातील अडथळे दूर करण्याच्या सरकारच्या धोरणास आर्थिक उदारीकरणाचे धोरण म्हणतात.

वरील सर्व व्याख्या अभ्यासल्यावर उदारीकरण म्हणजे

* आयात, उत्पादन आणि गुंतवणुकीवरील नियंत्रणे काढून टाकणे.
* परवाना पद्धती नाहीशी करणे



* बाजार यंत्रणेतील अडथळे दूर करणे.
* स्पर्धेतील अडथळे दूर करणे.
* उद्योगांना बाजारात प्रवेश करण्याचे व बाहेर पडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य.
* अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा निर्माण करणे.

**आर्थिक उदारीकरण कसे केले जाते ?**

एखाद्या राष्ट्रात अर्थव्यवस्थेवर अनेक प्रकारची नियंत्रणे असल्यास ती सर्वच नियंत्रणे एकदम काढून टाकणे योग्य ठरत नाही. त्यासाठी प्रथम किमतीवरील नियंत्रणे दूर करावी लागतात. असे केल्याने देशातील वस्तू व सेवा यावरील नियंत्रणे दूर होतील. साधनसामग्रीचे वाटप योग्य प्रकारे होऊ लागेल. उदारीकरणाच्या या अवस्थेला उदारीकरणाची पहिली अवस्था म्हणतात. या अवस्थेनंतर श्रम बाजार व भांडवल बाजारावरील नियंत्रणे दूर केली जातात. ही उदारकरणाची दुसरी अवस्था आहे. उदारीकरणाच्या तिसऱ्या अवस्थेत वित्तीय बाजारावरील नियंत्रणे दूर केली जातात. असे केल्याने देशातील पतपुरवठ्याचे योग्य वाटपही होऊ शकेल आणि त्याचप्रमाणे योग्य गुंतवणूकही होऊ शकेल. देशातील वित्तीय बाजाराचे उदारीकरण झाल्याने, म्हणजेच या बाजारावरील नियंत्रणे दूर झाल्याने देशातील अकार्यक्षम उद्योग संपुष्टात येतील. उदारीकरणाच्या चौथ्या अवस्थेत तंत्रज्ञानाची देवाण घेवाण, परदेशी व्यापारासंबंधीचे धोरण स्वीकारणे इत्यादींचा समावेश होतो.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक उदारीकरणाद्वारे साधनसामग्रीचा पर्याप्त वापर आणि उत्पादनात जास्तीत जास्त वाढ केली जाते. उदारीकरणाद्वारे आर्थिक विकास, राहणीमानात सुधारणा, आर्थिक स्थैर्य इत्यादी गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. उदारीकरणाचा कार्यक्रम एकदम अमलात आणावा का टप्प्याटप्प्यानी अमलात आणावा हे त्या राष्ट्राच्या आर्थिक स्थितीवरून ठरविता येते.

**आर्थिक उदारीकरणाची गरज का भासते ?**

एखाद्या राष्ट्रातील सरकारने अर्थव्यवस्थेवर विविध प्रकारची नियंत्रणे लादून विकास साध्य करण्याचा प्रयत्न चालविला असेल; परंतु या प्रयत्नात त्या राष्ट्राला फारसे यश येत नसेल तर नियंत्रण रद्द केल्याने विकास होऊ शकेल असे वाटत असेल, तर नियंत्रणे रद्द करण्याचा विचार योग्य ठरतो. याचाच अर्थ राष्ट्रात खरोखरच उदारीकरणाची गरज आहे काय याचा आधी विचार करावा लागतो. एकदा का सरकारने उदारीकरण करण्याचा निर्णय घेतला की, त्यानुसार सरकारला उदारीकरणाचा कार्यक्रम आखावा लागतो. या कार्यक्रमाची आखणी करताना सुरुवातीस नियंत्रणे दूर केली जातात. त्याचा परिणाम देशातील वस्तू व सेवावरील नियंत्रणे दूर होतील. त्यामुळे साधनसामग्रीचा वापर योग्य प्रकारे होऊ लागेल.

देशाला उदारीकरणाची गरज निर्माण झाल्यास ती यशस्वी करण्यासाठी देशातील

लोक, राजकीय पक्ष यांच्यात एकमत होणे आवश्यक असते. असे एकमत झाल्यावर उदारीकरणाच्या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत एकमत होणे आवश्यक ठरते. त्यासाठी देशातील सर्व पक्ष, राजकारणी लोक यांनी एक विस्तृत करार करून उदारीकरणाची अंमलबजावणी केली पाहिजे. विविध पक्षात एकमत नसेल तर उदारीकरणाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही

उदारीकरणाची अंमलबजावणीदेखील एकदम केली जात नाही. ती टप्प्याटप्प्यानेच केली जाते. समजा देशात साम्यवादी अर्थव्यवस्था आहे. या अर्थव्यवस्थेने आर्थिक विकासासाठी उदारीकरणाचा कार्यक्रम स्वीकारला. उदारीकरणाच्या कार्यक्रमानुसार सुरुवातीस किमतीवरील निर्बंध दूर केले जातात. त्यामुळे साधनसामग्रीचे वाटप योग्य प्रकारे होते. त्यानंतर श्रम व भांडवलावरील नियंत्रणे दूर केली जातात. त्यामुळे उत्पादन घटकात गतिशीलता निर्माण होते. त्यानंतर वित्तीय बाजारावरील निर्बंध दूर केले जातात. त्याचा परिणाम म्हणून विविध क्षेत्रात पतपुरवठ्याचे वाटप योग्य प्रकारे होऊ लागते. गुंतवणूक वाढविणे, आयात निर्यातीवरील बंधने हळूहळू दूर केली जातात. त्यामुळे निर्यात वाढून परकीय चलन मिळतेच; परंतु उत्पादन वाढून विकासाला चालना मिळते. थोडक्यात, राष्ट्राच्या विकासासाठी उदारीकरण हा एक मार्ग आहे. प्रत्येक राष्ट्राने हा मार्ग स्वीकारला पाहिजेच असे नाही. प्रत्येक राष्ट्राची भिन्न परिस्थिती असते. त्यामुळे तो कसा, किती प्रमाणात, कशा प्रकारे अमलात आणावयाचा हे त्या त्या राष्ट्राने ठरवावे लागते.

**भारतातील उदारीकरण :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जलद आर्थिक विकासासाठी सरकारने आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. तसेच औद्योगिक विकासासाठी वेळोवेळी औद्योगिक धोरणेही जाहीर केली. पंचवार्षिक योजना आणि औद्योगिक धोरणात सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या विकासाला प्राधान्य दिले. सरकारने पंचवार्षिक योजनेद्वारे समाजवादी समाजरचनेचाही स्वीकार केला होता. त्यामुळे सरकारने उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रावर अनेक प्रकारची नियंत्रणे, निर्बंध लादले होते. त्यामुळे स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे जरी झाली, तरी आर्थिक प्रगती फारशी समाधानकारक झाली नाही. दारिद्र्य, बेकारी, कमी प्रतीचे राहणीमान, अपुऱ्या क्षमतेचा वापर, दरडोई उत्पन्न कमी इत्यादी प्रश्न तसेच कायम राहिले. तेव्हा या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आपल्या आर्थिक धोरणात बदल करण्याची गरज सरकारला भासू लागली. त्यामुळे १९८० मध्ये मांडण्यात आलेल्या औद्योगिक धोरणात उदारीकरणाच्या धोरणाला मान्यता देण्यात आली. असे असले तरी खऱ्या अर्थाने १९९१ मध्येच सरकारने उदारीकरणाच्या धोरणांचा स्वीकार केला.

१९९१ मध्ये काँग्रेस पक्षाचे श्री. नरसिंहराव यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे



स्वीकारली; तेव्हा अर्थव्यवस्थेची स्थिती फारशी चांगली नव्हती. अर्थव्यवस्था मूळ पदावर आणण्यासाठी काही कठोर आर्थिक निर्णयाची गरज होती. जसे - अर्थव्यवस्थेवरील बंधने दूर करणे, उद्योगातील स्पर्धाशक्ती वाढविणे, अर्थव्यवस्था बाजाराभिमुख करणे इ. विकासासाठी भारताला उदारीकरणाचा मार्ग स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

**भारतातील उदारीकरणाचे टप्पे :**

भारतात उदारीकरणाची प्रक्रिया एकदम घडून आली नाही. या प्रक्रियेला विविध टप्प्यातून जावे लागले आहे. भारतात उदारीकरणाच्या कार्यक्रमाची सुरुवात १९९१ मध्ये जरी झाली असली, तरी या धोरणाचा पाठपुरावा १९७५ मध्येच करण्यात आला होता. १९७५ मध्ये सरकारने २१ उद्योग परवानामुक्त केले. त्यांना मर्यादित क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. १९७८ मध्ये परवाना पद्धती शिथिल करण्यात आली. त्याचप्रमाणे १९७५-८० या काळात सरकारने विदेशी भांडवलासंबंधी उदार धोरण स्वीकारले. १९८४, १९८५, १९८६ मध्ये नेमलेल्या अनेक समित्यांनीही उदारीकरणाला अनुकूल अशीच भूमिका घेतली होती १९८० मध्ये आयात उदारीकरणावर भर दिला. १९८२ मध्ये मागास भागात उद्योग सुरू करण्यास मोठ्या उद्योगांना नियंत्रण कायद्यांतर्गत परवानगी देण्यात आल. जे उद्योग निर्यातीची भूमिका स्वीकारतील त्यांना विस्तारीकरणाची परवानगी देण्यात आली. परकीय सहयोग त्याचप्रमाणे परकीय भांडवलातून औद्योगिकीकरणाला उत्तेजन देण्यासाठी उदारीकरणाच्या धोरणाचा अवलंब करण्यात आला.

१९८६ ते ९० या काळात अर्थव्यवस्थेतील स्पर्धाशक्तीत, कार्यक्षमतेत वाढ करण्यास योग्य वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या काळात म्हणजेच १९८६ मध्ये नेमलेल्या भागवती समितीनेदेखील उदारीकरणाबाबत अनुकूल भूमिका मांडली. या काळात अर्थव्यवस्था, जागतिकीकरणाच्या दृष्टीने अनेक क्षेत्रात खुली करण्यात आली. तसेच या काळात मागणीप्रमाणे उत्पादन करणाऱ्या उद्योगाला विविधीकरणाचे स्वातंत्र्य देण्यात आले. १९८६-८७ या काळात २७ उद्योगांना मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यातून मुक्त करण्यात आले. एवढेच नव्हे तर इलेक्ट्रॉनिक उद्योगात तंत्रज्ञान आयात करण्यास पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले. मक्तेदारी नियंत्रण कायद्यांतर्गत उद्योगाच्या संपत्तीची मर्यादा २० कोटी रुपयांवरून १०० कोटी रुपये करण्यात आली.

भारतात उदारीकरणाची सुरुवात फार पूर्वी म्हणजेच १९७५ मध्ये झाली हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. असे असले तरी खऱ्या अर्थाने उदारीकरणाची सुरुवात १९९१ च्या आर्थिक अरिष्टानंतरच झाली असे म्हणता येते. आर्थिक अरिष्टामुळे सरकारला आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम ताबडतोब आणावा लागला. १९९१ मध्ये भारत सरकारने

उदारीकरणाच्या धोरणाचा जो अवलंब केला त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

**१) परवाना पद्धती रद्द करण्यात आली** : राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक उद्योगाव्यतिरिक्त इतर सर्व उद्योग परवाना मुक्त करण्यात आले. याचाच अर्थ उद्योग सुरू करताना परवान्याची गरज आता राहणार नाही. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक वाढीस चालना मिळणार होती.

**२) सरकारच्या मालकीचे उद्योग कमी करणे** : १९९१ -९२ पासून सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे समभाग खाजगी संस्था, वित्तीय कंपन्या इत्यादींना विकून स्वतःची मालकी कमी करण्याचे धोरण स्वीकारले. १९९१-९२ ते १९९७-९८ या काळात सार्वजनिक क्षेत्रातील समभागांची विक्री करून सरकारने ११,३६९ कोटी रुपये उभारले.

**३) परकीय गुंतवणूकदारांना मुक्त प्रवेश** : सरकारने परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान यावरील नियंत्रणे रद्द केली. भारतातील औद्योगिक कंपन्यांच्या समभागात ५१% किंवा त्यापेक्षा जास्त भांडवलाची गुंतवणूक करण्यास परकीय उद्योगांना परवानगी देण्यात आली.

**४) मक्तेदारी नियंत्रण कायदा शिथिल करण्यात आला** : पूर्वी मक्तेदारी उद्योगातील गुंतवणुकीसंबंधीची कमाल मर्यादा १०० कोटी रुपयांची होती, ती रद्द करण्यात आली. त्यामुळे कोणत्याही उद्योगाला आपल्या आकारमानात आपल्या मर्जीनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले.

**५) आयात निर्यातीवरील निर्बंध दूर करण्यात आले** : उदारीकरणाच्या धोरणानुसार आयात-निर्यातीवरील निर्बंध दूर करण्यात आले. जकातीचे दर कमी करण्यात आले. एवढेच नव्हे तर सोन्याच्या आयातीवरील निर्बंध काढून टाकण्यात आले.

**६) रुपयाचे परिवर्तन** : उदारीकरणाच्या धोरणामुळे विदेशी चलनाच्या व्यवहारावरील नियंत्रणे रद्द करण्यात आली. त्याचप्रमाणे रुपया व्यापारखाते व चालू खात्यावर परिवर्तनीय करण्यात आला. सध्याच्या काळात रुपयाचा विनिमय दर मागणी पुरवठ्यावरून ठरतो.

**७) 'फेरा' कायद्याच्या ऐवजी 'फेमा' करण्यात आला** : परकीय चलन व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी परकीय चलन नियंत्रण कायदा (Foreign Exchange Regulation Act : FERA) होता. त्याऐवजी परकीय चलनाच्या व्यवहारावर कमीत कमी निबंधणे असणारा 'फेमा' (Foreign Exchange Management Act : FEMA) कायदा करण्यात आला.

**८) व्याजदरावरील नियंत्रणे रद्द** : उदारीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करण्यासाठी श्री. नरसिंहम समितीने केलेल्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या.



त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खासगीकरण करण्याचा निर्णय, बँकांना निर्णय स्वातंत्र्य, व्याजदराबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

या व्यतिरिक्त कर पद्धतीत सुधारणा करण्यासाठी राजा चलय्या समितीने केलेल्या सर्व शिफारशी सरकारने स्वीकारल्या. एवढेच नव्हे तर भारतीय भांडवल बाजार आणि नाणेबाजार यात पारदर्शकता यावी यासाठीदेखील प्रयत्न करण्यात आले.

**उदारीकरणाचा विविध क्षेत्रावर झालेला परिणाम :**

भारत सरकारने १९९१ पासून उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणाचा शेती, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रावर झालेल्या परिणामांची चर्चा येथे करू या.

**कृषिक्षेत्र** : भारतीय कृषिक्षेत्राची जगातील इतर देशातील शेतीशी तुलना केली असता आपणास असे दिसून येते की, भारतीय शेतीची उत्पादकता फारच कमी आहे. तसेच एकूण लोकसंख्येपैकी ७०% लोकांचा शेती हाच व्यवसाय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे व इतर उद्योगाची वाढ फारशी न झाल्याने शेती व्यवसायावरील लोकसंख्येचा भार सतत वाढत आहे.

स्वातंत्र्यापूर्वी देशातील लोकांची अन्नधान्यविषयक गरज भागविण्यासाठी परदेशातून धान्यातून आयात करावी लागे; परंतु १९६१ नंतर अन्नधान्य उत्पादनवाढीचे दीर्घकालीन धोरण आखून आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो. या व्यवसायातील उत्पादकता वाढावी, उत्पादन वाढावे, या उद्योगाला परकीय उद्योगाशी स्पर्धा करता यावी यासाठी सरकारने या व्यवसायाला संरक्षण दिले. परदेशातून खतांची आयात केली. खतासाठी व इतर अनेक कारणासाठी सरकारने शेतीला अनुदान दिले; परंतु उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर सरकारने शेतीविषयक धोरणात अनेक बदल करण्यात आले.

भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर साहजिकच भारतातून निर्यात होणाऱ्या शेतमालावरील नियंत्रणे दूर झाली. निर्यातीला प्रोत्साहन देण्यात आले. खतांच्या बाबतीत देण्यात येणारी अनुदाने कमी करण्यात आली. सरकारतर्फे खरेदी केल्या जाणाऱ्या धान्याच्या किमती वाढविण्यात आल्या. एवढेच नव्हे तर शेतीला पुरेसा वित्तपुरवठा व्हावा याची काळजी घेण्यात आली.

कृषि क्षेत्रात उदारीकरणाचे धोरण राबवून सरकारने या क्षेत्राच्या विकासासाठी एक नवीन संधी उपलब्ध करून दिली आहे. भारतीय कृषिक्षेत्रात विविधता आहे, नैसर्गिक अनुकूलता आहे. त्यामुळे तुलनात्मकदृष्ट्या भारताला फायदा मिळू शकतो. त्यामुळे निर्यातीत वाढ होऊ शकते. निर्यात वाढ झाल्यास उत्पादकता, उत्पन्न आणि रोजगार वाढीस चालना मिळू शकेल. थोडक्यात उदारीकरणामुळे कृषिक्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

सरकारने उदारीकरणाचा स्वीकार केला आणि कृषिक्षेत्राच्या विकासाला चालना

देण्याचे ठरविले. या धोरणामुळे उत्पादनात वाढ होऊन निर्यातीला चालना मिळेल असे सरकारचे अनुमान होते; परंतु निर्यात वाढविण्यासाठी सरकारला या क्षेत्रातील उत्पादनक्षेत्र कमी करून उत्पादित मालाचा दर्जाही वाढवावा लागेल. तसेच कृषी माल जलद गतीने पोचण्यासाठी वाहतुकीच्या साधनात वाढ करावी लागेल. या मार्गाचा अवलंब केल्याने निर्यातीत जरी वाढ होईल हे जरी खरे असले, तरी निर्यातीमुळे देशात भाववाढ होणार नाही याची काळजीदेखील सरकारला घ्यावी लागेल. सरकारने आपल्या उदारीकरणाच्या धोरणानुसार आयातीवरील सीमाशुल्काचे प्रमाण कमी केले. १९९०-९१ मध्ये कृषी मालावरील आयात सीमा शुल्क १०६% होते ते १९९५-९६ मध्ये २६% एवढे कमी केले. त्याचप्रमाणे सरकारने कृषीमालाच्या आयातीवरील निर्बंध दूर केले. भारताप्रमाणेच जगातील इतर राष्ट्रे, ज्यांनी उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला आहे तेदेखील असे निर्बंध काढून टाकतील. त्यामुळे भारताची निर्यात वाढेल. १९७५-७६ मध्ये भारतात अन्नपदार्थांची आयात १३४३ कोटी रुपयांची होती. एकूण आयातीत तिचे प्रमाण २५% एवढे होते. १९९५-९६ पर्यंत ती कमी होऊन ८० कोटी रुपयांवर आली. १९९३ नंतर शेतमाल, फळे, फुले भाज्या यांची निर्यात करण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. याचा परिणाम म्हणून १९९३ मध्ये शेतमालाची निर्यात १३०२१ कोटी रुपये होती, ती १९९६-९७ मध्ये २४२३९ कोटी रुपये एवढी झाली. थोडक्यात उदारीकरणाच्या धोरणामुळे शेतमालाच्या उत्पादनात वाढ झालीच; परंतु त्याचबरोबर निर्यातीतही वाढ झाली.

**औद्योगिक क्षेत्र** : १९९१ च्या मध्ये सरकारने स्वीकारलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाने भारताच्या औद्योगिक क्षेत्रात बरेच बदल घडून आले. या धोरणाद्वारे भारतातील उद्योगाची कार्यक्षमता, कामगिरीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. जसे औद्योगिक परवाना पद्धत शिथिल करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योगाच्या समभागाची अपगुंतवणूक करण्यात आली. परकीय गुंतवणुकीबाबत सैल धोरण स्वीकारण्यात आले. खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात आले. त्याचप्रमाणे परकीय गुंतवणूकदारांना भारतीय उद्योगात गुंतवणूक करण्यास, नवीन उद्योग स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. एवढेच नव्हे तर जकात व आयात शुल्क कमी करण्यात आले.

उदारीकरणाच्या या नव्या धोरणामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली. मक्तेदारी कायदा शिथिल केल्याने उद्योग ताब्यात घेणे, उद्योगाचा विस्तार, उद्योगाच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली. मक्तेदारी कायद्यातील शिथिलतेमुळे अनेक लहान मोठ्या उद्योगात विलीन झाले. त्यामुळे उद्योगाची कार्यक्षमता वाढीस लागली. उदारीकरणाच्या धोरणाने आजारी उद्योग बंद करता येणे शक्य झाले. उद्योगाचे



आधुनिकीकरण करण्यासाठी पूर्वीच्या कामगार कायद्यात बदल करण्यात आले. नव्या कामगार कायद्यानुसार आतापर्यंत ८७८०० कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. उद्योगाच्या आधुनिकीकरणासाठी व कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय नवीनीकरण निधी स्थापन केला.

उदारीकरणाच्या धोरणामुळे सुरुवातीच्या दोन वर्षात औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन वाढीचा दर कमी होता. १९९१-९२ या वर्षात औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक केवळ ०.६% एवढाच होता. तक्ता क्र.१० वरून हे स्पष्ट होते की, १९८१-८२ ते १९९०-९१ या काळात उत्पादनवाढीचा सर्वसाधारण निर्देशांक ७.८% एवढा होता, परंतु १९९१-९२ ते १९९८-९९ या काळात मात्र तो कमी होऊन ५.८ % एवढा झाला. म्हणजे उदारीकरणाच्या काळात औद्योगिक उत्पादनात वाढ झाली नाही. तथापि सन २००९-१० मध्ये तो १०.५ झाला.

**तक्ता क्र. १५.१**

**औद्योगिक उत्पादन वृद्धीदर**

| क्षेत्र | १९८१-८२ ते १९९०-९१ | १९९१-९२ ते १९९८-९९ | २००९-१० |
|---|---|---|---|
| १. मुलभूत वस्तू | ७.० | ६.२ | ७.२ |
| २. भांडवली वस्तू | ११.५ | ३.० | १९.२ |
| ३. अर्ध उत्पादित वस्तू | ५.९ | ७.७ | १३.६ |
| ४. ग्राहकोपयोगी वस्तू | ६.७ | ५.५ | ७.३ |
| अ) टिकाऊ | १३.७ | ७.९ | २६.२ |
| ब) बिगर टिकाऊ | ५.५ | ५.० | १.३ |
| सर्वसाधारण निर्देशांक | ७.८ | ५.८ | १०.५ |

Source : RBI Report on Currency and Finance. (1998-99)

Handbook of statistics on Indian Economy (2009-10)

१९९३-९४, ९४-९५, ९५-९६ या काळात उत्पादनवाढीचा सर्वसाधारण निर्देशांक ६%, ९.४, ४.१२% ने वाढला. त्यानंतर मात्र त्यात घट होत जाऊन तो १९९८-९९ मध्ये ७.१% एवढा झाला. १९९४-९५, १९९५-९६ या काळात भांडवली वस्तू उत्पादन वाढीचा निर्देशांक २४.८% व १७.९% एवढा होता. थोडक्यात उदारीकरण धोरणामुळे औद्योगिक उत्पादनावर फारसा चांगला परिणाम झाला नाही.

**विदेशी व्यापार** : स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारताच्या विदेशी व्यापारावर विविध प्रकारची नियंत्रणे होती. आयातीवर तर कडक नियंत्रणे होती; परंतु १९७७-७८ पासून सरकारने 'आयातीबाबत उदारीकरणाचे धोरण स्वीकारले १९९१ नंतर

सरकारने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्याने खऱ्या अर्थाने विदेशी व्यापारावरील निर्बंध कमी होण्यास सुरुवात झाली. सरकारने आपल्या उदारीकरणाच्या धोरणानुसार विदेशी व्यापार मुक्त करण्याचे ठरविले. त्यानुसार १९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले. १९९४-९५ नंतर चालू खात्यावर रुपया पूर्णपणे परिवर्तनीय करण्यात आला. आयातीसंबंधी मुक्त धोरण, आयात करात कपात, निर्यातीवरील निर्बंध शिथिल करण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. सरकारच्या या धोरणामुळे १९९०-९१ मध्ये भारताची निर्यात १८.१५ अब्ज डॉलर होती. ती १९९५-९६ मध्ये ३२-५ अब्ज डॉलर एवढी झाली. त्याचप्रमाणे १९९०-९१ मध्ये आयात २७.९ अब्ज डॉलर होती ती १९९५-९६ मध्ये ४१.४ अब्ज डॉलर झाली. यावरून हे स्पष्ट होते की, या काळात निर्यातीत ७५.६% तर आयातीत ४८.६% वाढ झाली होती. १९९४-९५ मध्ये भारताचा व्यापार शेष ९.४ अब्ज डॉलर एवढा प्रतिकूल होता. तो १९९४-९५ मध्ये कमी होऊन ५ अब्ज डॉलर एवढा झाला. १९९५-९६ मध्ये त्यात वाढ होऊन तो ८.९ अब्ज डॉलर एवढा झाला. यावरून हे स्पष्ट होते की, उदारीकरणाचा भारतीय विदेशी व्यापारावर अनुकूल परिणाम झाला.

उदारीकरणाच्या धोरणामुळे भारताच्या परकीय चलनाच्या साठ्यातही वाढ झाली. १९९०-९१ मध्ये भारताजवळ केवळ २२३.६ कोटी डॉलरचा परकीय चलनाचा साठा होता. २०१० मध्ये या साठ्यात वाढ होऊन तो ३०९.७ शतकोटी डॉलर एवढा झाला. तसेच १९९०-९१ मध्ये विदेशी कर्जाचे GDP शी असलेले प्रमाण २८.७ टक्के होते. ते सन २०१० मध्ये १८.१ टक्के इतके झाले. सरकारने परदेशी व्यापार वाढविण्यासाठी विदेशी व्यापार धोरण पाच वर्षासाठी जाहीर केले. या धोरणानुसार सरकारने १९९७ पासून २७०० वस्तूंवरील निर्बंध काढून टाकले. त्यामुळे भारताची निर्यात वेगाने वाढली. भारतातून जगातील १९० देशांना ७५०० विविध वस्तू निर्यात केल्या जातात. १४० देशांतून ६००० वस्तूंची आयात होते. १९९८ पासून भारताच्या निर्यातीत १२.३% नी व आयातीत २७.८% ने वाढ झाली आहे. भारताची सर्वाधिक निर्यात अमेरिकेत होते. अलीकडच्या काळात आफ्रिकेच्या विकसनशील देशांना भारतीय वस्तूंची निर्यात केली जाऊ लागली आहे.

**उदारीकरणाच्या धोरणाचे दोष :**

उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केल्यावर काही चांगले परिणाम अर्थव्यवस्थेत दिसून आले. असे असले तरी उदारीकरणाच्या धोरणाचा अर्थव्यवस्थेवर काही प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येतात. काही प्रतिकूल परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) रोजगारात वाढ झाली नाही** : उदारीकरणाच्या धोरणामुळे रोजगारात वाढ झाली नाही, अशी टीका केली जाते. १९९१-९५ या काळात औद्योगिक उत्पादनात वाढ होऊनदेखील रोजगार पातळीत केवळ २.६% नेच वाढ झाली. उदारीकरणामुळे



ग्रामीण भागातील रोजगारात वाढ झाली नाही. बेकार कामगार शेती व्यवसायाकडे वळला. त्यामुळे शेतीवर लोकसंख्येचा भार वाढला. शेती व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांना मिळणारे वेतन कमी झाले. सन २००९-१० मध्ये ग्रामीण भागात २०.९ दशलक्ष लोक तर शहरी भागात ७.२ दशलक्ष लोक बेकार होते.

**२) लघुउद्योगावर प्रतिकूल परिणाम** : उदारीकरणामुळे लघु उद्योगावर फारसा परिणाम झाला नाही. उदारीकरणाच्या कार्यक्रमात लघुउद्योगांची संख्या वाढली; परंतु परकीय उद्योगापुढे हे उद्योग टिकू शकले नाहीत. त्यामुळे ५०% लघुउद्योग बंद पडले आणि काही आजारी पडले. २००८ अखेर आजारी लघुउद्योगांची थकबाकी ३०८३ कोटी रुपये होती. सन २००८ अखेर एकूण ८५,१८७ लघुउद्योग आजारी होते.

**३) वित्तीय तूट कमी झाली नाही** : उदारीकरणाचे धोरण स्वीकारण्यामागील मुख्य हेतू वित्तीय तूट कमी करणे हा आहे; परंतु सरकारला त्यात फारसे यश आलेले नाही. या धोरणात सरकारने विविध कराचे दर कमी केले. त्यामुळे सरकारला विविध करांपासून मिळणारे उत्पन्न कमी झाले. सरकारचा महसूल कमी झाला. एकीकडे महसुलापासून मिळणारे उत्पन्न कमी झाले; परंतु सरकारचा खर्च मात्र कोणत्याच प्रकारे कमी झाला नाही. १९९०-९१ मध्ये ८.३% तर १९९५-९६ मध्ये ५.८% राजकोषीय तूट होती. सन २०११-१२ मध्ये ही तूट ५.१% होती.

**४) आंतरराष्ट्रीय संस्थांचा प्रभाव वाढला** : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यासारख्या संस्थांच्या दबावामुळे भारताला उदारीकरणाचा निर्णय घ्यावा लागला, अशी टीका केली जाते. जागतिक बँक व नाणेनिधी अनेक राष्ट्रांना उदारीकरण करण्याचा आग्रह करीत आहे. या संस्था विविध प्रकारे जी मदत देतात ती आर्थिक धोरणाशी संबंधित असते. त्यामुळे जागतिक बँक व नाणेनिधीच्या आग्रहामुळेच भारताला उदारीकरणाचे धोरण स्वीकारावे लागले, हे काही प्रमाणात मान्य करावे लागते.

असे असले तरी भारताने जागतिक वित्तीय संस्थेच्या दबावाला बळी पडून उदारीकरणाचे धोरण स्वीकारण्यात काही तथ्य नाही. कारण या धोरणाचा स्वीकार केल्यामुळे भारताला अनेक फायदे मिळत आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्थांच्या दबावामुळे आर्थिक सुधारणा केल्या, या टीकेला काही अर्थ उरत नाही.

उदारीकरणाच्या धोरणावर या प्रकारच्या टीका जरी केल्या जात असल्या तरी उदारीकरण हे भारतीय अर्थव्यवस्थेला आवश्यक होते. उदारीकरणाचे धोरण यशस्वी होण्यासाठी, या धोरणाचे लाभ मिळण्यासाठी अंमलबजावणी योग्य प्रकारे होणे आवश्यक ठरते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकांचा सहभाग आवश्यक आहे. तसेच सरकारच्या कारभारात पारदर्शकता असणेही आवश्यक ठरते. कामगारविषयक कायदे, त्यांचे वेतन करार उत्पादकतेशी निगडित असावेत, तरच उदारीकरणाचा